http://www.epitomejournals.com Vol. 2, Issue 4, April 2016, ISSN: 2395-6968

Epitome Journals
International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968 | Impact Factor = 0.565

# अनुत्तरीत स्त्री प्रश्नांचा दीर्घ गर्भ संवाद : सांगा, तुम्हीच सांगा !

**डॉ. भा.ना.गाडेकर**

विभाग प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,

संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव,

जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) भारत

Email ID : bhana384@gmail.com

***Abstract :***

*"सांगा तुम्हीच सांगा ?" हा दीर्घ गर्भसंवाद असणारा कविता संग्रह कवी डॉ.प्रमोद पवार यांची मराठी भाषेतील तिसरी कलाकृती असावी. त्यांच्या 'मर्म' आणि 'स्पर्शातर' या काव्यसंग्रहाची आणि 'सांगा, तुम्हीच सांगा' या काव्यसंग्रहाची भाषिक वैशिष्टये समान असली तरी हा काव्यसंग्रह म्हणजे एक अनभिज्ञ प्रदेशाची ओळख आहे. सलग एकच विषय एक तर्फी संवादाच्या रुपाने मांडून कविने अखिल मानव विश्वाला विचार करायला लावणारी खाज निर्माण केली आहे. ही खाज एवढी महत्त्वाची आहे की त्यावर सृष्टीचा समतोलपणा अवलंबून आहे.*

***Keywords :*** *स्त्री – भ्रूण हत्या, गर्भसंवाद, लिंग भेद, स्त्री, पुरुष*

## Research Paper :

उद्दीष्टे :

१. काव्य संग्रहाचे स्वरुप समजावून घेणे.

२. भाषाशैलीचा आढावा घेणे.

३. आशयाचा गाभा लक्षात घेणे.

४. दीर्घ संवादाचे मूल्यमापन करणे.

५. काव्यसंग्रहातील वाङ.मयीन वैशिष्टये मांडणे.

संशोधन पध्दती :

सदर शोधनिबंधाच्या विश्लेषणासाठी वाचन – आकलन – अस्वाद – मूल्यमापन व विश्लेषण या पध्दतीचा वापर केलेला आहे.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.

विषय विश्लेषण :

स्त्री – भ्रूण हत्ये संदर्भात आवाज उठविणारा एक तर्फी संवाद उभा करण्याचा प्रयत्न "सांगा तुम्हीच सांगा..." च्या माध्यमातून कवी डॉ. प्रमोद पवार यांनी सक्षमपणे केलेला दिसतो. लिंग भेद, स्त्री – पुरुष असमानता, लोकसंख्येतील असमतोल, जन्माचा नाकारलेला नैसर्गिक अधिकार, मानवी इतिहासाने अखिल स्त्रीजातीला दिलेली दुय्यमतेची वागणूक या संदर्भातील अनेक प्रश्न कवीने या दीर्घ संवादातून उभे केले आहे. आणि या निर्माण झालेल्या परिस्थितीला कारणीभूत असणारी व्यवस्थाही स्त्री आणि पुरुष या दोघांनी मिळून उभी केली असल्याचे संकेत कवीने या संदर्भाने दिला आहे. या दीर्घ संवादाच्या माध्यमातून उभे राहिलेले अनेक प्रश्न अनुत्तरीत आहे. त्याचे उत्तर देण्याचे सामर्थ्य या व्यवस्थेत दिसत नाही. ही परिस्थिती बदलली नाही तर त्याचे होणारे परिणामही या गर्भसंवादातून व्यक्त झाले आहे.

"तुम्ही तुमच्या मुलांना
मुलगी पाहणार
आणि ती मिळेल तरी कुठं?"

(डॉ. प्रमोद पवार, सांगा तुम्हीच सांगा... P. 13)

अतिशय साधी आणि सोपी निवेदन शैली असलेल्या या ओळीतून उभा केलेला प्रश्न हा विचार करायला लावणारा आहे. प्रश्न साधा आहे परंतु लिंग समानतेचा विचार करायला लावणारा आहे आई– वडिल आणि एकुणच मानव जातीला अंतर्मुख करा यला लावणारा हा प्रश्न आहे.

एकविसाव्या शतकात पदार्पन केल्यानंतर जागतिकीकरणाच्या संदर्भात आपण मोठमोठया गप्पा मारतो आणि मोठा इतिहासही सांगतो. स्त्री कर्तृत्वाचा इतिहास अभिमानाने सांगतो त्याचाही संदर्भ कवीने घेतला आहे.

"सावित्रीबाईची शाळा
मदर टेरेसाची माया
कल्पना चावलाची भरारी
केवळ एक धडाच
राहिला तुम्हाला".....

(डॉ. प्रमोद पवार, सांगा तुम्हीच सांगा...P. 10)

जगाच्या आणि भारताच्या उन्नतीसाठी महिलांनी एवढा इतिहास रचला असला तरी अजून तिला समानतेचा दर्जा मिळालेला नाही. पुरुषी अहंकाराच्या झळा कुठपर्यंत पोहचू शकतात त्याचा पौराणिक संदर्भही दिले आहेत.

"रामायण आणि
महाभारतातून
काय माझे प्रश्न
सुटले आहेत....."

(डॉ. प्रमोद पवार, सांगा तुम्हीच सांगा...P. 25)

रामायण महाभारताच्या काळापासून आधुनिक आणि आधुनिकोत्तर काळलागून जागतिकीकरण सुरु झाले तरी अजून स्त्रियाचे प्रश्न अजून अनुत्तरीतच आहे. मी तर एक भूक आहे हेही हा गर्भ मान्य करतो.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.

"मी एक भूक आहे
कधी पोटाची तर कधी
वासनेची"

(डॉ. प्रमोद पवार, सांगा तुम्हीच सांगा...P. 14)

स्त्री म्हणजे वासनेची शिकार असून पुरुषी अहंकाराच्या गप्पा मारणा-या पुरुषार्थाचे नपुसक झेंडे मिरवणा-याना खालील ओळीतर झणझणीत अंजन आहे.

"द्रौपदीचं वस्त्रहरण करतांना
कुठ गेला होता हो तुमचा पुरुषार्थ?"

(डॉ. प्रमोद पवार, सांगा तुम्हीच सांगा...P. 22)

मी वासनेची भूक असले तरी तुमच्या घराला घरपण देणारी सुध्दा मीच आहे? असा भावूक प्रश्नही हा गर्भ विचारतो. प्रेमानं सारं जग जिंकता येतं असं तुम्ही म्हणता मग मी एवढा सदा त्याग करुनही माझ्याच बाबतीत तुमचे प्रेम कुठे आटले. असा प्रश्नही हा गर्भ विचारतो.

अस्तित्वाचे अस्तित्वाच्या लढाईचे, जगण्याच्या उर्मिचे आणि संघर्ष करण्याच्या तयारीचे आणि मानववंशाच्या समांतर पातळीसाठी जगण्याची दुर्दम्य इच्छा व्यक्त करणारा हा संवाद आहे.

"मी म्हणजेच सुरुवात आणि
तुमचा शेवट आहे
खोटं आहे का सगळं?"

(डॉ. प्रमोद पवार, सांगा तुम्हीच सांगा...P. 07)

मानवी उत्पत्तीचे मूळ म्हणजे गर्भ आणि गर्भ फक्त मादीच (स्त्री) धारण करु शकते. जर गर्भच नसेल तर पुरुष कुठून बाळाचे संगोपण, मायेची पाखर, दुःखात सहभाग देणारी स्त्रीच असते मग ती आई–बहीण, पत्नी, कोणीही असो सुरुवात आहे आणि शेवटही आहे. असे असले तरी पुरुषी सत्ता ते मान्य करायला तयार नाही. मग, सत्यही जर पुरुषी अहंकार मान्य करत नसेल तर हे सगळं 'खोटं आहे का?' हा प्रश्नही हा गर्भ विचारतो. बोलण्यातील ताकद, शब्दातील साधेपणा आणि परावलंबित्व एवढे आहे की हा गर्भ सुध्दा सुरक्षित राहणार की नाही हा प्रश्नही या गर्भाला पडतो.

"आई मी झोपल्यानंतर
तू माझे प्राण तर
घेणार नाहीस ना?"

(डॉ. प्रमोद पवार, सांगा तुम्हीच सांगा...P. 52)

जगू देण्याची शाश्वती नसणारा हा प्रश्न आहे. आणि तो सुध्दा सुंदर आईलाच. एका स्त्रीलाच आहे म्हणजे हा धोका फक्त पुरुषी अत्याचाराचाच परिणाम नाही तर स्त्री सुध्दा जबाबदार असल्याचे सूचित होते.

"कुणाशी बोलते आहे मी हे सारं"

(डॉ. प्रमोद पवार, सांगा तुम्हीच सांगा...P. 48)


Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.

असं म्हणत समोर बसलेले, एकणारे पाहणारे सर्व स्मृतीभ्रंश झालेले तर नाही. किंवा माझा आवाज त्यांच्या पर्यंत पोहचतो की नाही? हा अनुत्तरीत प्रश्नही या गर्भाला पडतो. तो पुढे म्हणतो,

"माझा संवाद समजण्यासाठी
आपणाला ही यावं लागेल
माझ्या सोबत या स्त्री गर्भात पुन्हा"

(डॉ. प्रमोद पवार, सांगा तुम्हीच सांगा...P. 46)

माझे दुःख, यातना, माझे म्हणने, माझी आर्त हाक, माझे मन समजण्यासाठी तुम्हाला पुन्हा त्याच ठिकाणी यावे लागेल जेथे मी आता आहे आणि तुमची उत्पत्ती ही जेथून झाली आहे.

काव्याच्या विश्वानुभवा पेक्षा हा संवाद म्हणजे वेगळया विश्वाची अनुभूती देणारा आहे त्याचा कधी कल्पनेतही माणूस विचार करत नसेल. परंतु ती वेळ आता आलेला आहे. मानवीच नव्हे तर संपूर्ण सजीव अस्तित्वाला धक्का देणारा आणि विचार प्रवण बनवणारा संवाद आहे. कवी पुढे म्हणतो,

"हा संवाद आहे स्त्रीवादाचा
हा संवाद आहे स्त्रीमुक्तीचा
हा संवाद आहे मीपणाचा
हा संवाद आहे जन्माआधीचा"

(डॉ. प्रमोद पवार, सांगा तुम्हीच सांगा...P. 40)

एकंदरीत स्त्री अस्तित्वाच्या मूळ गाभ्याला हात घालणारा हा संवाद आहे. इथे जन्मच सुरक्षित नाही मारेकरी टपून बसलेले आहेत रस्त्या–रस्त्यात आडवळणावर जागोजागी मग शेवटपर्यंतची लढाई कशी असेल. याची सर्व इतंभूत खाचा– खोचा व्यक्त करणारी ही कविता आहे.

निष्कर्ष : कविने एका बैठकीत लिहिला हा गर्भसंवाद म्हणजे अखिल कविच्या अनुभव विश्वाला जनू अव्हान आहे. आम्ही सर्व जगतो, अनुभवतो, मानतो, तोलतो मात्र ते सर्व आणि सर्व कळण्याच्या अवस्थेनंतर मात्र कवी येथे गेला आहे जेथे मानवी उत्पत्तीचे मूळ आहे. अनभिज्ञ असा प्रदेश काळोखाचा अंधार आणि अबोल, अव्यक्त, आणि परावलंबित अवस्था. कविच्या लेखनात पाल्हाळीकता, असमतोलपणा, अनुभवाची साकळीतील खंडितपणा असे दोष आहेत. मात्र साधी भाषा, दीर्घ एकतर्फी संवाद , सरळ शब्द फेक, उसने न घेतलेले उपमालंकार, निवेदनातील सामान्यपणा, अनभिज्ञ विषयाची निवड आणि निवेदन शैलीतील संवादरुपक ही वैशिष्टये नाविन्यपूर्ण आहे.

समारोप : एकतर्फी आलेल्या या संवादातील बहुतांश प्रश्न हे अनुत्तरीत आहे हे एक वैशिष्टय या संवाद काव्याचे जाणवते. ज्यांनी हे प्रश्न निर्माण केले ज्यांनी पोसले यांचा परिणाम होतो आहे. या सर्व व्यवस्थेकडे यातील ब-याच आणि विशेष म्हणजे महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे नाही आहेत. म्हणून हे काव्य म्हणजे अनुत्तरीत स्त्री प्रश्नांचा दीर्घ संवाद ठरतो.

## References :

Pawar, Pramod Ambadasrao. *Saanga Tumhich Saanga*. Aurangabad: Sakshat Publications, 2013.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.